# प्रकरण तिसरे

# संशोधनाची कार्यपद्धती

# प्रकरण तिसरे

## *संशोधनाची कार्यपद्धती*

३.१ प्रस्तावना

३.२ संशोधनाची कार्यपद्धती

३.३ नमुना निवड

३.४ संशोधनाची साधने

- १) प्रश्नावली
- २) मुलाखत
- ३) भेटी व निरिक्षण

३.५ समारोप

# प्रकरण तिसरे

## *संशोधनाची कार्यपध्दती*

### ३.१ प्रस्तावना

मागील प्रकरणामध्ये संबंधित साहित्य व संशोधनाचे समालोचन केलेले आहे.

या प्रकरणामध्ये सदर संशोधनासाठी आवश्यक माहिती कशी मिळविली, माहिती मिळविण्यासाठी कोणती संशोधन पध्दती वापरली, कोणती साधने वापरली या बाबत माहिती दिलेली आहे.

### ३.२ संशोधन पध्दती

संशोधनाच्या प्रामुख्याने तीन पध्दती आहेत.

१) ऐतिहासिक संशोधन पध्दती -

भूतकाळातील माहितीचे संशोधन करण्यासाठी जी पध्दती वापरली जाते तिला ऐतिहासिक संशोधन पध्दती असे म्हणतात.

२) वर्णनात्मक संशोधन पध्दती -

वर्तमानकाळातील माहितीचे संशोधन करण्यासाठी जी पध्दती वापरली जाते तिला वर्णनात्मक संशोधन पध्दती असे म्हणतात.

३) प्रायोगिक संशोधन पध्दती

भविष्यकाळातील माहितीचे संशोधन करण्यासाठी जी पध्दती वापरली जाते तिला प्रायोगिक संशोधन पध्दती म्हणतात.

प्रस्तुत संशोधनात वर्तमानाकालीन सदयस्थितीबाबत असल्याने संशोधिकेन सर्वेक्षण पध्दती अंतर्गत शालेय सर्वेक्षण या प्रकारचा अवलंब केला आहे. शैक्षणिक प्रश्नामध्ये मुलामुलींचे शिक्षण त्यांना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे. त्यावर उपया

योजना ठरविणे या बाबी येतात. शैक्षणिक संस्थामध्ये शाळांची संख्या मोठी असल्यामुळे या प्रकारास शालेय सर्वेक्षण असे नाव दिले आहे.

संशोधन करण्याकरिता पध्दती निश्चित केल्यानंतर संशोधन मर्यादीत वेळेत करण्यासाठी नुमना निवड करणे आवश्यक असते.

## ३.३ नमुना निवड

संशोधनाचा विषय "उच्च माध्यमिक स्तरावरील मुलींचे शिक्षण एक चिकित्सक अभ्यास" हा असल्याने बार्शी तालुक्यतील कला, वाणिज्य, विज्ञान हया शाखा असलेली सर्व कनिष्ठ महाविद्यालये सदर संशोधनासाठी निवडली, त्यांची संख्या १५ होती. संशोधनासाठी या सर्वच कनिष्ठ महाविद्यालयांचा विचार केला आहे.

संशोधनाकरिता माहिती संकलित करण्यासाठी विशिष्ट पध्दतीनुसार संशोधनाची साधने वापरली जातात. खालील संशोधन साधनांचा त्यासाठी वापर केला.

## ३.४ संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधन हे सर्वेक्षण या प्रकारचे असल्याने त्या करिता प्रश्नावली, मुलाखती व निरीक्षण या साधनांचा उपयोग सदर संशोधनासाठी केला.

१) प्रश्नावली - संशोधनासाठी पहिले साधन प्रश्नावली हे वापरले. उच्च माध्यमिक शाळेतील मुलींच्या शिक्षणाची माहिती मिळविण्यासाठी त्या शाळेच्या प्राचार्यांसाठी प्रश्नावली तयार केली. तसेच प्रत्येक उच्च माध्यमिक शाळेत अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांसाठी दुसरी प्रश्नावली तयार केली. त्या प्रश्नावल्या प्रथम मार्गदर्शकांना दाखविल्या त्यांनी ज्या सुधारणा सुचविल्या त्या विचारात घेऊन प्रश्नावली पुन्हा तयार केली. त्यामध्ये काही तृटी राहू नयेत म्हणून त्या पी.एच.डी, एम.फील च्या चार मार्गदर्शकांना तपासण्यास दिल्या. त्यांच्या सुचना

विचारात घेवून त्या प्रश्नावलीमध्ये सुधारणा केल्या. प्रश्नावली मध्ये आलेले प्रश्न संशोधनातील उद्दिष्टानुसार माहिती मिळविण्यास पुरेस आहे का ते पाहण्यासाठी व उद्दिष्टांनुसार माहिती मिळते का? त्यासाठी प्रश्नांची समप्रामणात व विश्वसनीयाता तपासण्यासाठी त्या प्रश्नावली ४ प्राचार्यांना व ४ प्राध्यापकांना मार्गदर्शक म्हणून भरुन घेतल्या. त्यानुसार प्रश्नावलीमध्ये पुनः सुधारणा करुन त्या निश्चित केल्या व त्यांच्या प्रती तयार केल्या. ती बार्शी तालुक्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांना दिली. प्राचार्यांना प्रश्नावली पोष्टाव्दारे पाठविली. ती १५ दिवसात पूर्ण भरुन परत पाठवावी म्हणून पुरेशा पोष्टजसह एक लिफाफा सोबत पाठविण्यात आला. १५ पैकी ७ प्राचार्यांनी प्रश्नावली पोष्टाने पूर्ण भरुन १५ दिवसात दिली तर ५ प्राचार्यांनी प्रत्यक्ष भेटून प्रश्नावली भरुन दिल्या. तर ३ प्राचार्यांनी प्रश्नावली भरुन पाठविण्यासाठी स्मरणपत्रे पाठविल अशाप्रकारे सर्व १५ प्रश्नावल्या भरुन परत मिळविल्या.

प्राचार्यासाठी प्रश्नावली तयार केली तिची रचना खालीलप्रमाणे -

**कोष्टक क्र. ३.१**

**प्राचार्यांच्या प्रश्नावलीतील प्रश्नाचे वर्गीकरण**

| **प्र.क्र.** | **प्रश्नाव्दारे मिळणारी माहिती** |
|---|---|
| ०१ ते ०४ | प्राचार्यांची व्यैयक्तिक माहिती |
| ०५ ते १४ | महाविद्यालयाची माहिती |
| १५ ते २३ | भौतिक सुविधा विषय माहिती |
| २४ ते २८ | मुलींच्या शिक्षणाच्या सामाजिक दृष्टीकोनाविषयी माहिती |
| २९ ते ३४ | मुलींच्या आर्थिक समस्याविषयीची माहिती |

प्राचार्यासाठी तयार केलेली प्रश्नावली परिशिष्ठ क्र. १ मध्ये दिलेली आहे. प्रतिसादक प्राचार्यांची यादी परिशिष्ठ क्र. २ मध्ये दिली आहे. प्राचार्यांच्या प्रश्नावलीतून मिळणाऱ्या माहितीशी पूरक माहिती मिळावी म्हणून दैनंदिन अध्यापना विषयी व मुलीच्या समस्यांशी संबधीत माहिती जाणून घेण्यासाठी प्राध्यापकांसाठी दुसरी प्रश्नावली तयार केली. ती परिशिष्ठ क्रमांक ४ मध्ये दिली आहे. प्राध्यापकांच्या प्रश्नावलीतील प्रश्नांची रचना समजावी म्हणून खालील कोष्टकात त्या प्रश्नावलीच्या प्रश्नाचे वर्गीकरण केले आहे.

**कोष्टक क्र. ३.२**

**प्राध्यापकांच्या प्रश्नावलीतील प्रश्नाचे वर्गीकरण**

| प्र.क्र. | प्रश्नाव्दारे मिळणारी माहिती |
|---|---|
| ०१ ते ०५ | वैयक्तिक माहिती व विद्यार्थिनीच्या समस्या विषयीची माहिती |
| ०६ ते ०८ | सहशिक्षणाचे फायदे व तोटे विषयक माहिती |
| ०९ ते १३ | शिक्षण व अभ्यासक्रम विषयक माहिती |
| १४ | मुलींच्या समस्या निवारण्यासाठी उपाय. |

प्रश्नावलीसाठी प्राध्यापकांची निवड करताना १५ कनिष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान शाखांच्या प्राध्यापकापैकी एका जेष्ठ प्राध्यापकांला प्रश्नावली पाठविली ती भरुन देण्यासाठी विनंती पत्र पाठवून त्या परत पाठविण्यासाठी पुरेशा पोष्टेजसह लिफाफा पाठविला एकूण १८ प्राध्यापकांना प्रश्नावल्या पाठविल्या सर्वांनी भरुन दिल्या. प्रतिसादक प्राध्यापकांची यादी परिशिष्ट नं. ४ मध्ये दिली आहे.

प्रश्नावली शिवाय दुसरे साधन मुलाखतीचे वापरले

२) मुलाखत - प्रश्नावलीतून जी माहिती मिळाली नाही ती माहिती मिळविण्यासाठी व इ. ११ वी व इ. १२ वीच्या मुलींच्या सर्व समस्या त्यांना विश्वासात घेऊन विचारण्यासाठी त्यांच्या मुलाखती घेतल्या.

मुलाखतीचे स्वरुप पुढीलप्रमाणे होते.

**कोष्टक क्र. ३.३**

**मुलींच्या मुलाखतीतील प्रश्नांचे वर्गीकरण**

| प्र.क्र. | प्रश्नाव्दारे मिळणारी माहिती |
|---|---|
| ०१ ते ०८ | वैयक्तिक माहिती व महाविद्यालय विद्यार्थिनीच्या समस्या विषय माहिती |
| ०९ ते १२ | सामाजिक समस्याविषयी माहिती |
| ११ ते १८ | पालक व विद्यार्थिनी यांच्या शिक्षणाशी असणाऱ्या व दृष्टीकोना विषयी माहिती |
| १९ | मुलींच्या शिक्षणामध्ये अपेशित सुधारेणेविषयी माहिती |

मुलींच्या मुलाखतीसाठी प्रत्येक उच्च माध्यमिक विद्यालयातील ५ मुलींची निवड केली.

३) भेटीव्दारे निरीक्षण

संशोधिकेने बार्शी तालुक्यातील एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी दिल्या व संबंधित घटकांचे निरीक्षण करुन नोंदी घेतल्या. भेटी देऊन निरीक्षण केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

## कोष्टक क्र. ३.४

### भेटीसाठी निवडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्गीकरण

| अ.क्र. | संबंधित क्षेत्र | कनिष्ठ महाविद्यालय |
|---|---|---|
| १ | ग्रामीण भागातील माध्यमिकशी सलग्न, विना अनुदानित कनिष्ठ महाविद्यालये | १ |
| २ | ग्रामीण भागातील माध्यमिकशी संलग्न अनुदानित कनिष्ठ महाविद्यालये | ८ |
| ३ | शहरी भागातील माध्यमिकशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालये | ३ |
| ४ | शहरी भागातील वरिष्ठ महाविद्यालयाशी सलग्न कनिष्ठ महाविद्यालये | ३ |
| | एकूण | १५ |

## ३.५ समारोप

या प्रकरणामध्ये संशोधनाची कार्यपध्दती थोडक्यात दिली आहे. संशोधनासाठी माहिती कशी मिळविली हे दिल्यानंतर त्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन कसे केल ते पुढील प्रकरणात दिले आहे.

# संदर्भ

१. मुळे, रा.शं. व वि.तु. उमाठे (१९७७)

शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ पृ.क्र. १११.

२. Wilkinson & Bhadarkar (1984)

Methodology and Techiques of Socail Research, Bombay : Himalaya publishing house ramdott p.no 199.

३. घाटोळे रा.ना. (१९८८)

समाजशास्त्रीय संशोनधन, तत्वे व पध्दती, नागपूर : श्री मंगेश प्रकाशन पृ.क्र. २०५

४. बापट, भा.गो. (१९७१)

शैक्षणिक संशोधन, पुणे : नूतन प्रकाशन, पृ.क्र. १०१.

५. ओडियार, सुशिला (१९७९)

सामाजिक संशोधन, कोल्हापूर : अजब, पुस्तकालय भाऊ सिंगजी रोड, पृष्ठ क्र. २०७.

६. संत, दु.का. (१९७१)

संशोधन पध्दती, प्रक्रिया व अंतरग, पुणे : लोकसंग्रह मुद्रणालय पृ.क. २०१.